# कट्टी

झाडांच्या अभावी,
पावसाने केली कट्टी,
आणि रागा रागानी,
घेतली मोठ्ठी सुट्टी!

काही वर्षांनी कदाचित,
पाऊसही कृत्रिम पडेल,
पिकतील मळे नी शेतं,
आणि तहानही भागेल !

पण
पागोळ्या दिसतील का?
आहे मनात शंका!
बेडूक ओरडतील का?
की जातील श्रीलंका?

तेव्हा नसेल टिपटिप
आवाजातील गंमत,
विजा होतील गुडूप
संपेल ना मग जंमत?

शाळेभोवती तळे साठून
मग सुट्टी मिळणार नाही,
अचानक सरीत भिजून
मग गाणे गातां येणार नाही!

कागदाच्या मग होड्या,
कोणी करेल काय?
मोराला नाचतांना गड्या,
कोणी बघेल काय?

पाऊस असेल महाग
त्याचा होईल ही लिलाव,
गरीबांचे मात्र होतील हाल गं,
करतील कसा ते बचाव?

**......चित्रा मेहेंदळे**